दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ | अंक - ३३८ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

दिनांक : ६ सप्टेंबर २०२६ वार : रविवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : दशमी तिथी (रात्री ०७:२९ पर्यंत) त्यानंतर एकादशी तिथी नक्षत्र : आर्द्रा नक्षत्र (रात्री ०७:५२ पर्यंत) त्यानंतर पुनर्वसू नक्षत्र योग : सिद्धि योग (सकाळी ०९:४४ पर्यंत) त्यानंतर व्यातीपात योग करण : वाणीजा करण (सकाळी ०८:४१ पर्यंत) त्यानंतर विस्ती भद्रा करण (रात्री ०७:२९ पर्यंत)

### कुर्डुसमध्ये दहीहंडीचा थरार!

**पुणे :** दहीहंडीचा सण म्हटलं की ढोल-ताशांचा गजर, गगनचुंबी मानवी मनोरे आणि 'गोविंदा आला रे'चा जयघोष डोळ्यांसमोर उभा राहतो. मात्र, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील कुर्डुस गावात दरवर्षी दहीहंडीचा एक असा अनोखा आणि अंगावर काटा आणणारा थरार रंगतो, जो पाहण्यासाठी संपूर्ण कोकणातून गर्दी होते. इथे हंडी फोडण्यासाठी कुठलेही थर लावले जात नाहीत, तर चक्क २५ ते ४० फूट उंचीवरून विहिरीच्या मध्यभागी झेप घेत हवेतच हंडी फोडून थेट पाण्यात सूर मारला जातो.

# देवाच्या दारातही जात पाहणार?

## ‘एससी’ असल्यामुळे मंदिरात प्रवेश रोखणे म्हणजे अस्पृश्यताच!

## मद्रास उच्च न्यायालयाचा भेदभाव करणाऱ्यांना इशारा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**चेन्नई : वृत्तसंस्था**

मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी भक्ताची जात तपासायची आणि अनुसूचित जातीच्या व्यक्तीला देवदर्शनापासून रोखायचे ही केवळ सामाजिक विकृती नाही, तर थेट घटनात्मक अधिकारांवरचा हल्ला आहे, असा स्पष्ट संदेश मद्रास उच्च न्यायालयाने दिला आहे. अनुसूचित जातीच्या व्यक्तीला त्याच्या जातीच्या आधारावर मंदिरात प्रवेश नाकारणे म्हणजे ‘अस्पृश्यता’ पाळण्यासारखेच असून, अशा प्रकारचा भेदभाव भारतीय राज्यघटनेच्या कलम १७ च्या विरोधात असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती भरत चक्रवर्ती यांनी दिलेला हा निर्णय मंदिरप्रवेशाच्या अधिकाराबरोबरच जातीय भेदभावाविरुद्धच्या लढ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

घटनाकारांनी अस्पृश्यता संपवण्यासाठी राज्यघटनेच्या कलम १७ मध्ये अत्यंत स्पष्ट शब्दांत तिचे उच्चाटन केले आहे. मात्र ७५ वर्षांहून अधिक काळ उलटूनही जर एखाद्या व्यक्तीला केवळ त्याची जात पाहून मंदिराच्या दारात थांबवले जात असेल, तर प्रश्न केवळ धार्मिक परंपरेचा राहत नाही; तो कायदा आणि संविधानाचा बनतो. मद्रास उच्च न्यायालयाने याच मूलभूत मुद्द्यावर बोट ठेवत जातीय आधारावर मंदिरप्रवेश रोखणाऱ्या मानसिकतेला कायद्याची ढाल मिळू शकत नाही, हे अधोरेखित केले.




न्यायालयाच्या निरीक्षणाचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे अशा भेदभावासाठी जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई होऊ शकते. म्हणजेच ‘ही आमची परंपरा आहे’, ‘गावाची पद्धत आहे’ किंवा ‘मंदिराची जुनी प्रथा आहे’ अशा कारणांमागे लपून कोणालाही अनुसूचित जातीच्या व्यक्तीला देवदर्शनापासून रोखता येणार नाही. संविधानाच्या दृष्टीने नागरिकाचा सन्मान आणि समानता हे कोणत्याही कथित सामाजिक प्रथेपेक्षा वरचढ आहेत.

या निर्णयामुळे मंदिर व्यवस्थापन, धार्मिक संस्था आणि स्थानिक पातळीवरील जातीय दबावगटांसमोरही गंभीर प्रश्न उभा राहतो. देवासमोर सर्व समान असल्याचे सांगायचे आणि मंदिराच्या प्रवेशद्वारावर मात्र जातीनुसार रेषा आखायची, हा दुटप्पीपणा संविधान मान्य करत नाही. धार्मिक श्रद्धेला संरक्षण असले तरी त्या श्रद्धेच्या नावाखाली मूलभूत अधिकारांवर गदा आणण्याची मुभा कोणालाही नाही.

विशेषतः ग्रामीण भागात जातीय बहिष्कार आणि मंदिरप्रवेशावरून होणारे वाद अजूनही सामाजिक वास्तव असल्याच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाचे महत्त्व वाढते. मंदिर हे सार्वजनिक धार्मिक स्थळ असल्यास तेथे प्रवेशाचा अधिकार जातीनुसार बदलता कामा नये, हा या निर्णयातून अधोरेखित होणारा व्यापक घटनात्मक संदेश आहे. म्हणूनच मद्रास उच्च न्यायालयाचा हा निर्णय केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित न राहता ‘देवाच्या दारात जात विचारणाऱ्यांना कायद्याच्या दारात उभे केले जाऊ शकते’, असा स्पष्ट इशारा देणारा ठरतो. संविधानाने अस्पृश्यता संपवली आहे; आता समाजानेही तिच्या उरलेल्या सावल्या संपवण्याची वेळ आली आहे.

### सारांश वृत्त

## केतन अग्रवाल हत्याकांडाला नवं वळणं; चेतन-सियाला मदत करणारा तिसरा आरोपी कोण?, बीड कनेक्शन उघड

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
पुणे/ प्रतिनिधी

शहरातील चर्चेत असणाऱ्या केतन अग्रवाल हत्याकांड प्रकरणाला नवं वळण मिळाले आहे. या प्रकरणी आणखी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याला सहआरोपी बनवले जाऊ शकते असं बोलले जाते. माहितीनुसार, पोलिसांच्या ताब्यात असणारा हा नवा आरोपी चेतन चौधरीचा वर्गमित्र रितेश हिंगे हा आहे. १८ जूनला लोहगड किल्ल्यावर केतन अग्रवाल याच्या हत्येचा कट रचण्याबाबत रितेशला आधीच माहिती होते. चेतन चौधरी आणि त्याची गर्लफ्रेंड सिया गोयल या दोघांनी वर्गमित्रासोबत हत्येची योजना बनवली होती. या हत्याकांडाच्या संपूर्ण कटाची चर्चा या तिघांमध्ये झाली होती. चेतन आणि सियाने रितेशलाही लोहगडला सोबत येण्यास अनेकदा सांगितले होते. मात्र त्याने येण्यास नकार दिला. परंतु केतन अग्रवाल हत्याकांडाबाबत रितेशला आधीच माहिती होती. केतनच्या हत्येनंतर कथितपणे चेतन चौधरी आपल्या या मित्राला भेटला होता असा पोलिसांचा संशय आहे. सिया गोयलही त्याच्या संपर्कात होती. आरोपी चेतन चौधरी याच्या फोन रेकॉर्डमधून पोलीस रितेश हिंगे याच्यापर्यंत पोहचले. हा आरोपी मूळचा बीड जिल्ह्यातील रहिवासी असल्याचं समोर येत असून तो पुण्यातील बालेवाडी येथे एका खासगी कंपनीत काम करतो. मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यातही तो चेतन चौधरीच्या संपर्कात होता. आता या नव्या आरोपीचा हत्याकांडात काय सहभाग होता आणि त्याची गुन्ह्यात काय भूमिका होती याचा शोध पोलीस घेत आहेत. दरम्यान, १८ जूनला लोहगड किल्ल्यावर कधी काय घडले, कुणाला याबाबत माहिती होते आणि कुणाला नाही या सगळ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचं काम पोलीस करत आहेत. परंतु तपासात चेतन आणि सियानंतर आणखी एक नाव समोर आले आहे. हे नाव समोर आल्याने या हत्याकांडात फक्त दोघे नाही तर आणखीही लोक सहभागी असू शकतात असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

## स्वतंत्र भारद्वाजला अटक; पण तक्रारदार विरोधातही FIR, न्यायाचा तराजू कुणाच्या बाजूने?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

जंतर-मंतर मारहाण प्रकरणात पोलिसांची कारवाई; डउ/डढ कलमे वाढवली, हत्येच्या प्रयत्नाचा आरोप तपासानंतर ठरणारनवी दिल्ली / वृत्तसंस्था : जंतर-मंतरवरील विद्यार्थी आंदोलनादरम्यान १४ वर्षीय आंदोलकाच्या वडिलांना मारहाण केल्याचा दावा करणारा व्हिडिओ समोर आल्यानंतर चर्चेत आलेल्या स्वतंत्र भारडजला अखेर दिल्ली पोलिसांनी अटक केली. मात्र, या प्रकरणाला आता वेगळे वळण मिळाले असून तक्रारदाराविरोधातही दिल्ली पोलिसांनी ऋखठ दाखल केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईवर नव्या प्रश्नांची मालिका निर्माण झाली आहे.

२३ जून रोजी परीक्षा पेपरफुटीच्या मुद्द्यावरून जंतर-मंतर येथे आंदोलन झाले होते. आंदोलनाचे मोबाईलवर चित्रीकरण करणाऱ्या एका आंदोलकाच्या वडिलांशी भारडज यांची झटापट झाल्याचा उल्लेख मूळ ऋखठमध्ये आहे. त्यावेळी भारडजला ताब्यात घेऊन नंतर सोडण्यात आले होते. मात्र, त्यानंतर एका पॉडकास्टमध्ये भारडजने या घटनेबाबत केलेल्या कथित वक्तव्यामुळे प्रकरण पुन्हा पेटले. त्याने संबंधित व्यक्तीला मारहाण केल्याचा दावा केल्याचे आणि गंभीर कलम लागू होऊ शकते, असे माहीत असूनही आपल्यावर तत्काळ कारवाई झाली नसल्याचे सांगितल्याचा आरोप आहे. या वक्तव्यामुळे दिल्ली पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले. दरम्यान, १४ वर्षीय विद्यार्थिनीने सोशल मीडियावर भावनिक व्हिडिओ प्रसिद्ध करून भारडजच्या समर्थकांकडून धमक्या मिळत असल्याचा दावा केला. त्यानंतर या प्रकरणात कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली. सीजेपीचे नेते तसेच लोकसभा खासदार चंद्रशेखर आझाद आणि पप्पू यादव यांनी संसद मार्ग पोलीस ठाण्याबाहेर आंदोलन केले. पोलिसांशी चर्चेनंतर ऋखठमध्ये डउ/डढ कायद्यांतर्गत संबंधित कलमे जोडण्यात आल्याचे सांगण्यात आले. हत्येच्या प्रयत्नाचे कलम लावायचे की नाही, याबाबत वैद्यकीय आणि अन्य पुराव्यांच्या आधारे निर्णय घेतला जाईल, अशी पोलिसांची भूमिका आहे. यानंतर बुलंदशहरमधून भारडजला ताब्यात घेण्यात आले आणि न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.

मात्र, एवढ्या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर केवळ एका दिवसाची कोठडी का मागण्यात आली, असा सवाल तक्रारदाराच्या वकिलांनी उपस्थित केला आहे. याहून गंभीर प्रश्न म्हणजे तक्रारदाराविरोधातही ऋखठ दाखल झाल्याची बाब. कायदा सर्वांसाठी समान असेल, तर तक्रारदाराविरोधातील आरोपांचीही निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे; पण त्याच वेळी मूळ मारहाण, कथित कबुली आणि धमक्यांच्या आरोपांची तीव्रता कमी होणार नाही याची खात्री तपास यंत्रणेने करणे आवश्यक आहे.

कारण या प्रकरणाचा केंद्रबिंदू कोणता राजकीय गट कोणाच्या बाजूने आहे हा नसून कायद्याची अंमलबजावणी समान निकषांनी होते का, हा आहे. एखाद्या प्रभावशाली व्यक्तीने सार्वजनिकपणे गंभीर कृत्याची बढाई मारल्याचे आरोप असतील, तर त्याची सत्यता तपासणे पोलिसांचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे तक्रारदाराविरोधात स्वतंत्र आरोप असतील, तर त्यांचाही तपास झाला पाहिजे.

स्वतंत्र भारडजने नंतर आपली कृती स्वसंरक्षणासाठी होती, असा दावा केला आहे. त्यामुळे अंतिम दोष निश्चित होणे न्यायालयीन प्रक्रियेवर अवलंबून आहे.

## देवेंद्र फडणवीसांचे 'वसुधैव कुटुंबकम्' फक्त व्यासपीठापुरतेच? भाषणातील उदात्त मूल्यांचा आणि राजकीय वास्तवाचा विरोधाभास

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**मुंबई / प्रतिनिधी**

‘ग्लोबल इम्पॅक्ट फोरम २०२६’ च्या उद्घाटनप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आर्थिक संबंधांपलीकडे जाऊन मानवी मूल्ये, सांस्कृतिक वारसा, संवाद आणि 'वसुधैव कुटुंबकम्' या मूल्यांवर भर दिला. जागतिक शांतता आणि समृद्धीसाठी सर्वसमावेशकता आणि परस्पर सन्मान आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले.

मात्र, फडणवीसांच्या या जागतिक आणि उदात्त भाषणाची तुलना जेव्हा त्यांच्या प्रत्यक्ष राजकीय कारकिर्दीशी केली जाते, तेव्हा भाषणातील विचार आणि राजकीय वास्तव यातील मोठी तफावत समोर येते.

**१. सर्वसमावेशकतेचा संदेश विरुद्ध राजकीय ध्रुवीकरण**

जागतिक व्यासपीठावर 'वसुधैव कुटुंबकम्' आणि सर्वसमावेशकतेचा नारा देणारे फडणवीस प्रत्यक्ष राजकारणात मात्र बहुसंख्याकवादी आणि आक्रमक हिंदुत्वाचा अजेंडा राबवताना दिसतात. निवडणुकीच्या काळात आणि राजकीय संघर्षात धार्मिक व सामाजिक ध्रुवीकरण करणाऱ्या भाषेचा वापर त्यांच्याकडून सातत्याने झाला आहे.

**२. 'संवाद आणि सहिष्णुता' विरुद्ध विरोधकांवर कारवाई**

भाषणात विविध विचारसरणींमधील संवाद आणि परस्परांच्या मतांचा आदर करण्याची भाषा केली जात असली, तरी प्रत्यक्षात महाराष्ट्रात राजकीय विरोधक, नागरी हक्क कार्यकर्ते आणि असहमती दर्शवणाऱ्या आवाजांना कशा प्रकारे सामोरे गेले गेले, हा मोठा प्रश्न आहे. तपास यंत्रणांचा वापर आणि राजकीय विरोधकांवर होणारे दबावतंत्र हे संवादाच्या संस्कृतीशी सुसंगत नाही.

**३. 'मानवी मूल्ये' विरुद्ध प्रत्यक्ष धोरणे**

परदेशातील प्रतिनिधींसमोर मानवी मूल्यांची आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीची चर्चा करणे सुलभ आहे; परंतु देशांतर्गत पातळीवर अल्पसंख्याक समुदाय आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील घटकांना मिळणारी वागणूक आणि सुरक्षेबाबतचे प्रश्न आजही कायम आहेत.

थोडक्यात सांगायचे तर, आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर 'सेक्युलर' आणि सर्वसमावेशक प्रतिमेचा वापर करणे ही एक मुत्सद्देगिरी असू शकते; परंतु हीच सर्वसमावेशकता आणि मानवी मूल्ये प्रत्यक्ष राजकीय व्यवहारात आणण्यात फडणवीस आणि त्यांचे सरकार अपयशी ठरल्याची टीका राजकीय विश्लेषकांकडून केली जात आहे.

## परदेशात ‘सेक्युलर’, देशात वेगळी भूमिका?

### मोहन भागवतांच्या लंडन दौऱ्यावरून सवाल; जागतिक संवादाच्या भाषेत सर्वसमावेशकता, मग भारतात त्याच कसोटीचे काय?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**लंडन / वृत्तसंस्था**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या लंडन दौऱ्यावरून निर्माण झालेला विरोध हा केवळ एका कार्यक्रमाला विरोध म्हणून पाहणे सोपे आहे; मात्र त्यामागे उपस्थित झालेले प्रश्न अधिक गंभीर आहेत. परदेशात विविध धर्मांचे नेते, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि भारतीय समुदायाशी संवाद साधताना सर्वसमावेशकतेचा संदेश दिला जात असेल, तर भारतातही त्याच भूमिकेची सातत्याने अंमलबजावणी होते का? हा प्रश्न आता आंतरराष्ट्रीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त अमेरिका, कॅनडा आणि ब्रिटनमध्ये संपर्क अभियान सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून भागवत लंडनमध्ये विविध समुदायांतील मान्यवरांच्या भेटी घेत असून भारतीय समुदायाला संबोधित करणार आहेत. मंदिर आणि गुरुद्वारा भेटींच्या माध्यमातून धार्मिक-सामाजिक संवाद साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र या दौऱ्याला ब्रिटनमध्ये विरोध करणाऱ्या सुमारे २० नागरी समाज संघटनांनी लंडनचे महापौर सादिक खान यांना पत्र पाठवून ग्रेटर लंडन अथॉरिटीने संघाच्या कार्यक्रमांना सहकार्य अथवा सभागृह उपलब्ध करून देऊ नये, अशी मागणी केली आहे. हिंदूज फॉर ह्युमन राइट्स, यूके-इंडियन मुस्लिम कौन्सिल, इंडिया लेबर सॉलिडॅरिटी आणि साउथ एशिया सॉलिडॅरिटी ग्रुप यांसह संघटनांनी आरएसएसच्या विचारसरणीवर गंभीर आरोप केले आहेत.

संघाला ‘हुकूमशाही’ आणि ‘लष्करी विचारसरणीचा’ गट संबोधत तो युरोपीय फॅसिझमपासून प्रेरित असल्याचा आरोप या संघटनांनी केला आहे. अर्थात, हे विरोधकांचे आरोप आहेत; त्यांना संघाची अधिकृत भूमिका किंवा न्यायालयीन निष्कर्ष समजणे चुकीचे ठरेल. मात्र एवढे निश्चित की, संघाच्या जागतिक प्रतिमेबाबत परदेशातही वैचारिक संघर्ष तीव्र होत आहे.

‘वसुधैव कुटुंबकम्’चा संदेश कुठे थांबतो?

या संपूर्ण वादाचा खरा मुद्दा येथेच आहे. भारताच्या बाहेर गेल्यावर हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, शिक्षणतज्ज्ञ आणि विविध सामाजिक घटकांशी संवाद साधणे, त्यांच्यासमोर सहिष्णुता आणि समावेशकतेची भाषा करणे स्वागतार्हच. पण मग भारतातही अल्पसंख्याक, विरोधक, असहमती व्यक्त करणारे नागरिक आणि विविध विचारसरणी यांच्याशी समान संवादाची संस्कृती का दिसू नये?

‘वसुधैव कुटुंबकम्’ हा संदेश जगाला देताना देशांतर्गत सामाजिक वातावरणाबाबत उपस्थित होणाऱ्या प्रश्नांची उत्तरेही द्यावी लागतील. कारण सेक्युलरिझम हा विमानात बसल्यानंतर सुरू होणारा आणि भारतात परतल्यावर विमानतळावर संपणारा विचार नाही.

भागवत यांच्या दौऱ्याचा उद्देश संघाची जागतिक ओळख मजबूत करणे हा असू शकतो. शंभर वर्षांचा प्रवास सांगताना संघाला जगासमोर स्वतःची भूमिका मांडण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण त्याच वेळी त्या भूमिकेवर प्रश्न विचारण्याचा अधिकार विरोधकांनाही आहे. आणि प्रश्न विचारले जात असतील तर त्यांना ‘भारतविरोधी’ किंवा ‘हिंदूविरोधी’ म्हणून झटकून न टाकता वैचारिक उत्तर देणे अधिक प्रभावी ठरेल.

अमेरिकेनंतर लंडनमध्येही विरोधाचा सूर उमटणे संघासाठी केवळ प्रतिमेचा प्रश्न नाही; तो संवादाच्या विश्वासार्हतेचा प्रश्न आहे. जगाला समावेशकतेचा संदेश देणाऱ्या संघाने भारतातील प्रत्येक समुदायाला त्याच समावेशकतेचा अनुभव देण्याची तयारी दाखवली, तरच हा जागतिक संवाद अर्थपूर्ण ठरेल.

# सुभाष चंद्रांवर सीबीआयचा गुन्हा; अंबानींविरोधातील आवाजाची ‘किंमत’ की आर्थिक गैरव्यवहाराचा हिशोब?

### १,३२२ कोटींच्या कथित नुकसानप्रकरणाने उद्योगविश्वात खळबळ; आरोप खरे असतील तर कठोर कारवाई व्हावी, पण प्रश्न इतकाचनिवडक कारवाईचा संशय का निर्माण होतो?

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**विशेष प्रतिनिधी । मुंबई**

मुंबई / प्रतिनिधी : उद्योग आणि माध्यमविश्वात एकेकाळी प्रभावशाली आवाज म्हणून ओळखले जाणारे सुभाष चंद्र आता सीबीआयच्या गुन्ह्यामुळे पुन्हा चर्चेत आले आहेत. एलआयसी हाउसिंग फायनान्सकडून कर्ज मिळवण्यासाठी संपत्तीचे मूल्य आणि नेटवर्थ फुगवून दाखवल्याच्या आरोपावरून सीबीआयने त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या कर्जांमुळे सार्वजनिक क्षेत्रातील कर्जदात्याचे तब्बल १,३२२ कोटी रुपयांहून अधिक नुकसान झाल्याचा आरोप आहे.

प्रकरणाची व्याप्ती मोठी आहे. तक्रारीनुसार, सुभाष चंद्र यांनी सादर केलेल्या नेटवर्थ प्रमाणपत्रांच्या आधारे दोन कर्जांना मंजुरी देण्यात आली. वसंत सागर प्रॉपर्टीजला ५०० कोटी आणि डिजिटल सबस्क्रायबर मॅनेजमेंट अँड कन्सल्टन्सी सर्व्हिसेसला ४८० कोटी रुपये देण्यात आले. दोन्ही कर्जांसाठी चंद्र यांची हमी असल्याचे तक्रारीत नमूद आहे.

धक्कादायक मुद्दा म्हणजे नेटवर्थ प्रमाणपत्रांमधील आकडे. एका प्रमाणपत्रात चंद्र यांची संपत्ती सुमारे ५९ हजार कोटी रुपये, तर दुसऱ्यामध्ये नेटवर्थ ४०,५६२ कोटी रुपये असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, पुढे ही कर्जे थकीत झाली आणि दिवाळखोरी प्रक्रियेदरम्यान या प्रमाणपत्रांमध्ये नमूद केलेली नेटवर्थ आपली नसल्याचे चंद्र यांनी सांगितल्याचा सीबीआयच्या तक्रारीत उल्लेख आहे.

जर तपासात हे आरोप सिद्ध झाले, तर हा केवळ एखाद्या उद्योगपतीचा आर्थिक वाद राहणार नाही. सार्वजनिक क्षेत्रातील वित्तसंस्थेकडून हजारो कोटींच्या कर्जव्यवहारात कागदपत्रांची पडताळणी नेमकी कशी झाली, हमीदाराची आर्थिक क्षमता कशी तपासली गेली आणि एवढ्या मोठ्या रकमेचे कर्ज मंजूर करताना जोखीम मूल्यांकन कुठे गेले, हे प्रश्नही तितकेच गंभीर आहेत.

पण या प्रकरणाला आणखी एक राजकीय आणि माध्यमीय संदर्भ आहे. सुभाष चंद्र यांनी यापूर्वी उद्योगविश्वातील मोठ्या नावांवर, त्यात मुकेश अंबानींचाही समावेश असलेल्या व्यावसायिक-सत्ताकेंद्रांवर, सार्वजनिकपणे टीका केली आहे. त्यामुळे आता त्यांच्या विरोधातील सीबीआय कारवाईकडे काही जण संशयाच्या नजरेने पाहत आहेत. मात्र, अंबानींविरोधात बोलल्यामुळेच हा गुन्हा दाखल झाला, असा निष्कर्ष काढण्यासाठी सध्या ठोस पुरावा उपलब्ध नाही.

म्हणून खरी कसोटी सीबीआयच्या तपासाची आहे. चंद्र यांच्यावरचे आरोप खरे असतील तर त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. पण त्याच वेळी आर्थिक गुन्ह्यांच्या तपासात व्यक्ती कोण आहे, तिची राजकीय भूमिका काय आहे किंवा ती कोणावर टीका करते, यापेक्षा पुरावे आणि कायदा समान असला पाहिजे.

कारण प्रश्न सुभाष चंद्रांचा किंवा मुकेश अंबानींचा एकट्याचा नाही. प्रश्न आहे तो कायद्याच्या तराजूचा. हा तराजू श्रीमंतांसाठी वेगळा, सत्तेच्या जवळ असणाऱ्यांसाठी वेगळा आणि सत्तेला प्रश्न विचारणाऱ्यांसाठी वेगळा असेल, तर लोकशाहीतील संस्थांवरील विश्वासच संशयाच्या भोवऱ्यात सापडेल. सीबीआयने त्यामुळे केवळ गुन्हा दाखल करून थांबण्याऐवजी संपूर्ण कर्जप्रक्रिया, प्रमाणपत्रे, संबंधित अधिकारी, हमी आणि निधीच्या वापराची साखळी पारदर्शकपणे तपासावी. आरोप सिद्ध झाले तर शिक्षा व्हावी; आरोप खोटे असतील तर संशय दूर व्हावा. पण तपासाच्या सावलीत ‘आवाजाची किंमत’ ठरवली जात आहे, असा संशयही निर्माण होता कामा नये.

## संपादकीय

### डीजेचा दणदणाट आणि सरकारची दुटप्पी शांतता! फडणवीस सरकार नागरिकांच्या बाजूने की राजकीय दबावासमोर?

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा, श्रद्धेचा आणि परंपरेचा उत्सव आहे. पण श्रद्धेच्या नावाखाली ध्वनी प्रदूषणाचा उन्माद सुरू झाला आणि डीजेच्या दणदणाटाने रुग्ण, वृद्ध, लहान मुले, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांचे जगणेच हैराण झाले, तर त्याला 'उत्सवाचा उत्साह' म्हणायचे की कायद्याची उघडपणे खिल्ली? हा प्रश्न आता महाराष्ट्राने सरकारला विचारण्याची वेळ आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डीजेमुळे नागरिकांना त्रास होत असल्याचे मान्य केले आहे. पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचे आणि ध्वनी प्रदूषण टाळण्याचे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्री म्हणून ही भूमिका स्वागतार्ह आहे. पण सरकारचे काम केवळ आवाहन करण्यापुरते आहे का? कायदे असताना त्यांची अंमलबजावणी कोण करणार? नियम मोडणाऱ्यांवर कारवाई कोण करणार? प्रशासनाला आदेश देण्याची जबाबदारी कोणाची?

मुख्यमंत्र्यांनीच नागरिकांच्या त्रासाची कबुली दिली असेल, तर त्यानंतरही कर्णकर्कश डीजे सुरूच राहणार असतील, तर मग मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाची किंमत काय? सरकारचा आवाज डीजेपेक्षा कमी का पडतोय?

ध्वनी प्रदूषणाचे नियम काही आज निर्माण झालेले नाहीत. न्यायालयीन निर्देश आहेत, कायदेशीर मर्यादा आहेत आणि त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन व पोलीस यंत्रणा आहे. मग प्रत्येक वर्षी गणेशोत्सव आला की सरकारने नागरिकांना पुन्हा विनंती करायची आणि नियम मोडणाऱ्यांना राजकीय, सामाजिक किंवा प्रशासकीय मोकळीक मिळायची हा कोणता कारभार?

कायदा सर्वांसाठी समान असेल तर तो गणेश मंडळांनाही लागू झाला पाहिजे आणि राजकीय नेत्यांनाही. उत्सवाच्या नावाखाली कायद्याला सुट्टी देता येणार नाही.

याहून गंभीर बाब म्हणजे सत्ताधारी व्यवस्थेतच या प्रश्नावर एकवाक्यता आहे का, हा प्रश्न.

मुख्यमंत्री एका बाजूला डीजेमुळे होणाऱ्या त्रासाबाबत चिंता व्यक्त करतात; दुसरीकडे सत्ताधारी पक्षातील काही नेते डीजेबंदीवर पुनर्विचाराची मागणी करतात. मग पोलिसांनी नेमके कोणाचे ऐकायचे? मुख्यमंत्र्यांचे की स्थानिक राजकीय नेत्यांचे?

ही केवळ राजकीय मतभिन्नता नाही. याचा थेट परिणाम कायदा–सुव्यवस्थेवर होतो. कारण मैदानावर कारवाई करणारा पोलीस अधिकारी असतो. त्याच्यावर वरून आदेशांचा दबाव असेल आणि राजकीय पातळीवर वेगवेगळे संदेश जात असतील, तर नियमांची अंमलबजावणी कशी होणार?

म्हणूनच आणखी एक अस्वस्थ करणारा प्रश्न समोर येतोफडणवीस आपल्या सरकारमधील संबंधित पालकमंत्र्यांना विश्वासात घेत आहेत का?

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात गणेशोत्सवाची परिस्थिती वेगळी आहे. कुठे मोठ्या मिरवणुका आहेत, कुठे संवेदनशील भाग आहेत, कुठे रुग्णालये आणि निवासी परिसर आहेत, तर कुठे वाहतुकीचा प्रश्न गंभीर आहे. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री, पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि पोलीस प्रशासन यांच्यात स्पष्ट समन्वय असणे आवश्यक आहे.

जर हा समन्वय होत असेल, तर सरकारची भूमिका एकसंध का दिसत नाही? आणि जर समन्वय होत नसेल, तर राज्यातील संवेदनशील विषयांवर सरकारचे नियंत्रण नेमके कुठे आहे?

मुख्यमंत्री एक बोलतात, सत्ताधारी पक्षातील नेते दुसरे बोलतात आणि प्रशासन संभ्रमात पडतेही परिस्थिती महाराष्ट्रासाठी धोकादायक आहे.

राजकारणासाठी काही तासांचा डीजेचा आवाज महत्त्वाचा असेल; पण सामान्य नागरिकासाठी तो संपूर्ण रात्र त्रासदायक ठरू शकतो. रुग्णाला विश्रांती हवी असते. वृद्धाला शांत झोप हवी असते. विद्यार्थ्याला अभ्यासासाठी शांत वातावरण हवे असते. लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. रुग्णालय परिसरात तर ध्वनी प्रदूषणाचा प्रश्न अधिक संवेदनशील आहे.

मग प्रश्न असाकाही मंडळांच्या उत्साहासाठी लाखो नागरिकांच्या शांततेचा बळी का?

परंपरा जपण्याच्या नावाखाली नियम मोडण्याला सरकारने संरक्षण दिले तर उद्या कोणताही नियम 'भावनेच्या' नावाखाली झुगारून देता येईल. वाहतूक नियमांपासून ध्वनी प्रदूषणापर्यंत प्रत्येक कायदा मग राजकीय सोयीचा विषय बनेल.

सरकारने हे थांबवले पाहिजे.

मुंबईत एक भूमिका, पुण्यात दुसरी, नागपुरात तिसरी आणि ग्रामीण भागात चौथीअसा कायद्याचा महाराष्ट्र होऊ नये. कायद्याला शहर, जिल्हा, मंडळ किंवा राजकीय ओळख नसते.

मुख्यमंत्र्यांनी आता केवळ आवाहन करून थांबण्याची वेळ संपली आहे. ध्वनी मर्यादा ओलांडणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश द्यावेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया कठोर करावी. धोकादायक लेझर लाईट्सच्या वापरावर नियंत्रण आणावे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कारवाई करताना कोणत्याही राजकीय दबावाला बळी पडू नये.

सत्ताधारी पक्षातील नेत्यांनाही मुख्यमंत्री एक स्पष्ट संदेश देणार काउत्सव कोणाचाही असो, कायदा मोडण्याची परवानगी कोणालाही नाही?

हा संदेश दिल्याशिवाय सरकारच्या आवाहनाला गांभीर्य येणार नाही.

कारण नागरिकांना सरकारकडून भाषणे नकोत; कृती हवी आहे. प्रशासनाला संदिग्ध राजकीय संकेत नकोत; स्पष्ट आदेश हवेत. पोलिसांना 'कोणाचा दबाव?' हा प्रश्न नको; कायद्याची अंमलबजावणी करण्याचे स्वातंत्र्य हवे.

डीजेचा दणदणाट काही तासांचा आहे. पण सरकारच्या भूमिकेतील दुटप्पीपणा लोकांच्या मनात दीर्घकाळ घुमू शकतो.

आज महाराष्ट्रासमोर त्यामुळे प्रश्न फक्त डीजेचा नाही. प्रश्न आहे सरकारच्या इच्छाशक्तीचा.

फडणवीस सरकार नागरिकांच्या आरोग्याच्या आणि शांततेच्या अधिकारासाठी उभे राहणार आहे की उत्सवाच्या नावाखाली होणाऱ्या राजकीय दबावापुढे माघार घेणार आहे?

मुख्यमंत्र्यांनी आता निवड स्पष्ट करावी.

कारण महाराष्ट्राला उत्सव हवा आहेध्वनीदहशत नाही.

परंपरा हवी आहेकायद्याची पायमल्ली नाही.

आणि सरकार हवे आहेराजकीय दबावापुढे मौन धारण करणारे प्रशासन नव्हे.

डीजेचा आवाज बंद होईलही; पण त्याआधी सरकारच्या इच्छाशक्तीचा आवाज ऐकू आला पाहिजे.

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलचा राष्ट्रीय स्तरावर त्रिगुणी गौरव

## शैक्षणिक उत्कृष्टतेसह प्राचार्या डॉ. बिंदू सैनी आणि मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी यांनाही पुरस्कार

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**



एस. बी. पाटील पब्लिक स्कूलने शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत राष्ट्रीय स्तरावर तीन पुरस्कार पटकावले आहेत. इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ स्कूल अॅक्रेडिटेशनच्या (खपींशअॅपरींळेपरश्र उेीपलळश्र ेष डलहेश्र अललअॅशवळींरींळेप) वतीने देण्यात आलेल्या या पुरस्कारांमध्ये शाळेसह प्राचार्या आणि मुख्याध्यापिकांचाही गौरव करण्यात आला.

देशभरातून अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या ३०० प्रवेशिकांमधून एस. बी. पाटील पब्लिक स्कूलची निवड करण्यात आली. शाळेच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबरोबरच नाविन्यपूर्ण उपक्रम, संस्थात्मक विकास, सहकारी मूल्यमापन आणि सातत्यपूर्ण सुधारणा या निकषांच्या आधारे पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

शाळेला 'शैक्षणिक उत्कृष्टता पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट शिक्षणपद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची या पुरस्कारासाठी विशेष दखल घेण्यात आली.

शाळेच्या प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांना 'उत्कृष्ट अध्यापन व प्रशासकीय कौशल्य पुरस्कार २०२६', तर मुख्याध्यापिका शुभांगी कुलकर्णी यांना 'उत्कृष्ट प्रशासकीय व प्रेरणादायी कौशल्य पुरस्कार २०२६' देऊन गौरविण्यात आले.

पुरस्कार सोहळ्यात डॉ. बिंदू सैनी यांनी 'आजच्या काळातील मानसिक आरोग्याचे वाढते महत्त्व' या विषयावर विशेष व्याख्यान दिले. सोशल मीडियामुळे विद्यार्थ्यांवर निर्माण होणारा ताण तसेच पालकांच्या वाढत्या अपेक्षांचा मुलांच्या मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम यावर त्यांनी प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या मानसिक आणि भावनिक आरोग्याकडेही गांभीर्याने पाहण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

पीसीईटीच्या उपाध्यक्ष पद्माताई भोसले यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थी हे भारताच्या उज्ज्वल भविष्याचे शिल्पकार आहेत, असे प्रतिपादन करत त्यांनी शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

# खनिज बाधितांच्या विकासासाठी आमदार शंकर जगताप यांची महत्त्वाची जबाबदारी

## जिल्हा खनिज प्रतिष्ठान पुण्याच्या नियामक परिषदेवर पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांची जिल्हा खनिज प्रतिष्ठान (चत्र), पुणेच्या नियामक परिषदेवर पदसिद्ध सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या खनिकर्म शाखेने याबाबतचे अधिकृत नियुक्तिपत्र जारी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार तसेच ११ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेतील तरतुदींनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खाणकामामुळे बाधित भागातील नागरिकांच्या विकासासाठी उपलब्ध होणाऱ्या निधीच्या नियोजन आणि वापरावर नियामक परिषद महत्त्वाची भूमिका बजावते.

परिषदेच्या माध्यमातून जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा वार्षिक कृती आराखडा व अर्थसंकल्प मंजूर करणे, विविध विकासकामांना मान्यता देणे, निधीचा योग्य आणि पारदर्शक वापर होत आहे की नाही याची खातरजमा करणे, मंजूर कामांचा वेळोवेळी आढावा घेणे, तसेच वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षित खात्यांना मंजुरी देणे, अशी महत्त्वाची कामे केली जातात.

खनिज उत्खननामुळे प्रभावित होणाऱ्या भागांमध्ये मूलभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पर्यावरण संवर्धनाशी संबंधित कामांना निधी उपलब्ध करून देणे, हा जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा महत्त्वाचा उद्देश आहे. त्यामुळे आमदार शंकर जगताप यांची या परिषदेवरील नियुक्ती त्यांच्या मतदारसंघासह जिल्ह्यातील खनिजबाधित भागांच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

जिल्हा खनिज अधिकारी तथा सदस्य सचिव आनंद पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने आमदार जगताप यांना नियुक्तिपत्र दिले आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाची गणेशोत्सव पूर्वतयारी बैठक संपन्न; विसर्जन आणि स्वच्छतेच्या नियोजनाचा आढावा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी : प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात उत्तम स्वच्छता राखण्यासाठी आणि गणेशमूर्ती विसर्जनासाठी आवश्यक त्या सुविधा सुरळीतपणे उपलब्ध करून देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातर्फे एका महत्त्वपूर्ण आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात ही बैठक पार पडली. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी विविध उपाययोजनांचा सविस्तर आढावा घेतला. गणेशोत्सव काळात नागरिकांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी दिले. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक ठिकाणे, मुख्य रस्ते, गणेश मंडळांचे परिसर तसेच विसर्जन मार्गांची नियमित व प्रभावी स्वच्छता राखण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच, विसर्जन स्थळांवर आवश्यक मनुष्यबळ, साधनसामग्री आणि स्वच्छता सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.या बैठकीला सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, राजू साबळे, सुधीर वाघमारे, महेश आढाव, अंकुश झिटे, राजेश भाट, अतुल सोनवणे आणि मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे यांच्यासह महापालिकेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणेश मंडळांच्या परवानग्या आता ऑनलाइन; मंडप, मिरवणूक, ध्वनिक्षेपकासाठी एकाच प्रक्रियेत अर्ज

## पिंपरी–चिंचवड, पुणे परिसरातील सार्वजनिक गणेशोत्सवासाठी प्रशासनाची सुविधा; अनधिकृत वीजजोडणी आणि नियमबाह्य डीजेला आळा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मंडळांना विविध शासकीय परवानग्या मिळविण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुलभ केली आहे. मंडप उभारणी, मिरवणूक, ध्वनिक्षेपक, अग्निशामक दल तसेच वाहतूक विभागाच्या मंजुरीसाठी मंडळांना ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. त्यामुळे परवानग्यांसाठी विविध कार्यालयांमध्ये हेलपाटे मारण्याची गरज कमी होणार आहे.

गणेशोत्सवात मंडप उभारणीपूर्वी संबंधित जागेचा तपशील आणि जागामालकाचे ना हरकत प्रमाणपत्र (छजउ) आवश्यक राहणार आहे. मंडळाची नोंदणी, अध्यक्ष व सचिवांचे ओळखपत्र, मंडपाचा आराखडा, मिरवणुकीचा मार्ग व वेळ यांसह आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन अर्जासोबत सादर करावी लागणार आहेत.

गणेश मंडळांनी मंडप व उत्सवासाठी महावितरणकडून अधिकृत तात्पुरती वीजजोडणी घेणे बंधनकारक आहे. अनधिकृतपणे वीजजोडणी घेणे किंवा वीज वापरणे आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई होऊ शकते. त्यामुळे मंडळांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिकृत वीजजोडणी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

गणेशोत्सवातील ध्वनिक्षेपक आणि डीजेच्या वापराबाबत प्रशासनाने निर्धारित केलेल्या वेळेच्या आणि ध्वनिपातळीच्या मर्यादांचे पालन करणे बंधनकारक आहे. उत्सवाच्या नावाखाली नियमबाह्य आवाज केल्यास कारवाईला सामोरे जावे लागू शकते. विशेषतः रुग्णालये, शाळा, निवासी परिसर आणि संवेदनशील ठिकाणांजवळ ध्वनिप्रदूषण टाळण्याची जबाबदारी मंडळांची राहणार आहे.

मंडळांनी ध्वनिक्षेपकाची माहिती, वीजजोडणीचा तपशील, मंडपाचा आराखडा आणि मिरवणुकीशी संबंधित आवश्यक माहिती अर्जात नमूद करणे अपेक्षित आहे.

प्रशासनाने सर्व सार्वजनिक गणेश मंडळांना वेळेत ऑनलाइन अर्ज करून आवश्यक परवानग्या घेण्याचे आणि गणेशोत्सव कायदे व नियमांचे पालन करून सुरक्षित, शिस्तबद्ध व पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन केले आहे.

# दहीहंडीचा मंडप काढताना लोखंडी सांगाडा कोसळला; महिलेचा जागीच मृत्यू

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**



दहीहंडी उत्सव संपल्यानंतर मंडपाचे लोखंडी स्ट्रक्चर काढताना झालेल्या दुर्घटनेत सलमा सलाउद्दीन पठाण (वय ४५) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. जुनी सांगवी परिसरात रात्रीच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दहीहंडीचा कार्यक्रम संपल्यानंतर रात्री सुमारे ११ वाजता मंडळाचे कार्यकर्ते मंडपाचे मोठे लोखंडी स्ट्रक्चर काढत होते. यावेळी स्ट्रक्चरचा अवजड भाग अचानक निसटून खाली कोसळला. त्याच ठिकाणी उपस्थित असलेल्या सलमा पठाण यांच्या डोक्यावर लोखंडी भाग आदळल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. या दुर्घटनेत त्यांचा जागीच मृत्यू झाला.

विशेष म्हणजे, सलमा पठाण यांचा मुलगा संबंधित दहीहंडी मंडळाचा सक्रिय कार्यकर्ता असल्याची माहिती आहे. त्यामुळे पठाण कुटुंबीयांनी या घटनेप्रकरणी पोलिसांकडे औपचारिक तक्रार दाखल करण्यास नकार दिला.

मात्र, घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी स्वतःहून अपघाताची नोंद केली असून पुढील कायदेशीर तपास सुरू केला आहे. दुर्घटनेमागे नेमकी कोणाची जबाबदारी आहे, सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात आल्या होत्या का आणि स्ट्रक्चर हटविताना आवश्यक खबरदारी घेण्यात आली होती का, याचा तपास केला जात आहे.

या घटनेमुळे सार्वजनिक सण–उत्सवांसाठी उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या लोखंडी संरचनांच्या उभारणीपासून ते त्या हटविण्यापर्यंतच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. उत्सवासाठी परवानगी घेताना ज्या सुरक्षा नियमांची पूर्तता अपेक्षित असते, त्यांची अंमलबजावणी मंडप काढतानाही होते का, याची तपासणी करण्याची गरज या दुर्घटनेने अधोरेखित केली आहे.

### रस्त्याच्या वादातून पिरंगुटमध्ये कोयत्याने प्राणघातक हल्ला

घटना : बावधन पोलीस ठाण्याच्या हद्दीत पिरंगुट (ता. मुळशी) येथील 'न्यू फेमस हेअर ड्रेसर्स सलून' समोर शेतातील पाऊलवाटेच्या जुन्या वादातून हा हल्ला झाला.

तपशील : आरोपी सचिन खंडू मालपोटे (वय ३१, रा. आनंदनगर, भुकुम) याने फिर्यादी रामभाऊ दामू मालपोटे (वय ३७, रा. भैरवनाथवाडी, कातरखडक) यांच्यावर "तुला आता जिवंत सोडत नाही" अशी धमकी देत कोयत्याने हात व डोक्यावर सपासप वार करून गंभीर जखमी केले. बावधन पोलिसांनी बीएनएस १०९, ३५२, ३५१(२), आर्म अॅक्ट आणि म.पो. कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

### ई–चलनच्या बहाण्याने पिंपरीतील व्यावसायिकाला पावणे सात लाखांचा गंडा

घटना : भोसरी एमआयडीसी हद्दीतील नेहरू नगर येथे सायबर चोरट्याने ई–चलन (श–उहरश्रश्ररप) फाईल पाठवून नागरिकाची फसवणूक केली.

तपशील : फिर्यादी इंदल नथुनी चौहान (वय ४४) यांच्या व्हॉट्सअॅपवर अज्ञात इसमाने ई–चलनची एपीके/संशयास्पद फाईल पाठवली. त्याद्वारे मोबाईलचा अॅक्सेस मिळवून चौहान यांच्या आयडीबीआय (I¦BI) बँक खात्यातून ६,८८,०००/– रुपये परस्पर ट्रान्सफर करून आर्थिक गंडा घातला. एमआयडीसी भोसरी पोलिसांनी आयटी अॅक्टसह गुन्हा नोंदवला आहे.

### शेलू येथे दुचाकी पेटवून घरातील साहित्याची नासधूस; दोघांवर गुन्हा

घटना : उत्तर महाळुंगे एमआयडीसी हद्दीतील ठाकरवाडी (शेलू, ता. खेड) येथे जुन्या कारणावरून वाद उफाळून आला.

तपशील : आरोपी मंगल पवार व सुदर्शन घोडकेकर यांनी फिर्यादी संदीप सोपान कडाळे (वय ३५) व त्यांच्या आईला घरात घुसून मारहाण व शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता फिर्यादींची हिरो होंडा स्प्लेंडर मोटारसायकल (क्र. MH-14-JN-6128) पेटवून दिली आणि घरातील कपडे व संसारोपयोगी साहित्याची तोडफोड करून सुमारे २९ हजार रुपयांचे नुकसान केले.

### चाकणमध्ये बांधकामाच्या वादातून सिमेंटच्या गट्टूने प्राणघातक मारहाण

घटना : चाकण उत्तर हद्दीतील देवेंद्र पार्क (कडाचीवाडी, ता. खेड) येथे प्लॉटिंग साईटवर हा वाद घडला.

तपशील : बांधकाम साहित्य दुसऱ्याच्या प्लॉटवर हलविल्याच्या कारणावरून आरोपी विश्वजीत गोरखनाथ मेदनकर याने फिर्यादी संभाजी भागुजी कड (वय ६७) यांच्या मुलाला शिवीगाळ व दमदाटी केली. फिर्यादी वाद सोडवण्यासाठी मध्ये पडले असता, आरोपीने त्यांच्या नाकावर आणि तोंडावर सिमेंटचा गट्टू (दगड) मारून गंभीर जखमी केले. चाकण पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सर्व प्रकरणांत संबंधित पोलीस ठाण्यांचे अधिकारी पुढील तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशी) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### निरगुडसर मंडळ कार्यक्षेत्रात कृषी अधिकाऱ्यांचा पाहणी दौरा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

निरगुडसर (ता. आंबेगाव) : निरगुडसर मंडळ कृषी अधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील वडगावपीर आणि मांदळेवाडी येथे विविध कृषी योजनांतर्गत देण्यात आलेल्या लाभांची पाहणी करण्यासाठी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचा दौरा आयोजित करण्यात आला होता. या पाहणी दौऱ्यात अन्न व पोषण सुरक्षा अभियानांतर्गत पीक प्रात्यक्षिके, कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत पीक प्रात्यक्षिके, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मग्रारोहयो) फळबाग लागवड तसेच पीएमएफएमई योजनेंतर्गत अनुदान प्राप्त लाभार्थी यांच्या कामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे यांनी विविध योजनांच्या लाभार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन योजनांच्या अंमलबजावणीची माहिती जाणून घेतली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून पीक व्यवस्थापन, उत्पादनवाढ आणि कृषी योजनांचा प्रभावी लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले. अन्न व पोषण सुरक्षा अभियानांतर्गत शेतकऱ्यांना वितरित करण्यात आलेल्या 'बलवान' या संकरित बाजरी वाणाबाबत शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. यंदा या वाणामुळे बाजरीचे उत्पादन विक्रमी होण्याची अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली. पाहणीदरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या शेतीतील अनुभव अधिकाऱ्यांसमोर मांडले तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांबाबत समाधान व्यक्त केले. या पाहणी दौऱ्यास तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे, मंडळ कृषी अधिकारी प्रसन्न जाधव, उपकृषी अधिकारी अरुण जोरी, सहाय्यक कृषी अधिकारी प्रवीण मिरके आणि विकास गवई उपस्थित होते.

# एआय मित्र : साधन की धोका?' विज्ञान नाटिकेला तालुकास्तरावर तृतीय क्रमांक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

राष्ट्रीय विज्ञान नाट्यमहोत्सवांतर्गत आयोजित तालुकास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेत जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा, थोरांदळे येथील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'एआय (अख) मित्र : साधन की धोका?' या विज्ञान नाटिकेने उत्कृष्ट सादरीकरण करत तालुकास्तरावर तृतीय क्रमांक पटकावला. अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक हेमराज भदाणे यांनी दिली.

लांडेवाडी (ता. आंबेगाव) येथील शिवाजीराव द. आढळराव पाटील विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत थोरांदळे शाळेच्या विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआयच्या सकारात्मक आणि नकारात्मक पैलूंवर प्रभावीपणे प्रकाश टाकला.

नाटिकेत एआयमुळे शिक्षणात होणारी मदत, वेळेची बचत, नवीन कल्पनांना मिळणारी चालना आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी यांसारख्या सकारात्मक बाबी मांडण्यात आल्या. त्याचबरोबर चुकीची अथवा आक्षेपार्ह माहिती, खासगी माहितीचा गैरवापर तसेच मानवी नातेसंबंधांवर होणारा परिणाम याबाबतही विद्यार्थ्यांनी प्रभावी जनजागृती केली.

तंत्रज्ञानाचा वापर करताना विवेक, जबाबदारी आणि सुरक्षितता किती महत्त्वाची आहे, हा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयातून दिला. त्यामुळे नाटिकेला उपस्थितांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

नाटिकेसाठी मार्गदर्शक शिक्षक म्हणून विनायक पडवळ,



वर्गशिक्षिका कमल संतोष थोरात, राज्य आदर्श पुरस्कारप्राप्त शिक्षक बाळासाहेब कानडे गुरुजी, शैला थोरात, विजय डोके, मिलिंद चिखले, श्वेता चिखले, संदीप शिंदे, अनिकेत आवटे आणि मंगल वाघ यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका, शिक्षण विस्तार अधिकारी शैला निमसे, केंद्रप्रमुख सीमा कहडणे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनेश टेमगिरे, उपाध्यक्ष सागर विश्वासराव आणि समितीच्या सर्व सदस्यांनी यशस्वी विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासोबतच तंत्रज्ञानाच्या योग्य आणि जबाबदार वापराबाबत जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे. या यशामुळे थोरांदळे शाळेच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील लौकिकात आणखी भर पडली आहे.

स्पर्धेचे नियोजन तालुका विज्ञान समन्वयक योगेश देशमुख, ज्योत्स्ना माशेरे, वनिता खराडे, परमेश्वर काकडे, नारायण चित्ते आणि आंबेगाव तालुका विज्ञान अध्यापक संघाने केले.

# मंचर बायपासवरील कालवा बनला धोकादायक; संरक्षक कठड्यांची तातडीने मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

मंचर शहराजवळून जाणाऱ्या डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यावरील बायपास रस्त्याला संरक्षक कठडे नसल्याने हा मार्ग अपघाताला आमंत्रण देत आहे. कालव्याला कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे वाहन कालव्यात कोसळून गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे बायपास रस्त्यालगत तातडीने संरक्षक कठडे बसवावेत, अशी मागणी नागरिक आणि वाहनचालकांनी केली आहे.

मंचर शहरातील रस्ते अरुंद असल्याने दोन वाहने एकमेकांना ओव्हरटेक किंवा पास करताना अडचणी निर्माण होतात. यापूर्वी श्री क्षेत्र भीमाशंकरकडे जाणारी बहुतांश वाहतूक शहरातूनच होत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत होती. मंचर-घोडेगाव रस्त्यावरील खर्डी नाल्याजवळील भाजी बाजारामुळेही वाहतूक कोंडीत भर पडत होती.

या पार्श्वभूमीवर मोरडेवाडी ते तपनेश्वर मंदिर या मार्गावर डिंभे धरणाच्या उजव्या कालव्यालगत बायपास रस्ता तयार करण्यात आला असून त्याचे डांबरीकरणही झाले आहे. सध्या हा मार्ग मोठ्या वर्दळीचा झाला असून दूरवरून येणारी वाहने मंचर शहरात न जाता बायपासने पुढे जात



आहेत.

मात्र, रस्त्याच्या पश्चिम बाजूला असलेल्या कालव्याच्या कडेला अद्याप कोणतीही संरक्षक व्यवस्था करण्यात आलेली नाही. धरणातून पाणी सोडल्यानंतर कालवा अनेकदा दुथडी भरून वाहतो. अशा परिस्थितीत अरुंद रस्त्यावरून वेगाने वाहनांची ये-जा सुरू असते. दोन मोठी वाहने एकमेकांना पास करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अत्यंत कमी जागा उरते. त्यामुळे वाहनचालकाचा थोडासा अंदाज चुकल्यास वाहन थेट कालव्यात कोसळण्याचा धोका आहे.

या ठिकाणी यापूर्वीही वाहने कालव्यात कोसळल्याच्या घटना घडल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यातच कालव्यालगत झाडे-झुडपे मोठ्या प्रमाणात वाढल्याने कालव्याची हद्द स्पष्टपणे दिसत नाही. रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसल्याने परिस्थिती अधिक धोकादायक बनते.

या बायपासवर एसटी बससह मोठ्या प्रमाणात अवजड वाहतूक होत असल्याने एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट प्रशासन पाहत आहे का?, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने केवळ अपघात झाल्यानंतर उपाययोजना करण्याची वाट न पाहता बायपास रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आवश्यक त्या ठिकाणी मजबूत संरक्षक कठडे, दिशादर्शक फलक आणि रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था तातडीने करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# वर्षभरापासून फरार आरोपीला पोलिसांनी मंदिरामागून केली अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

विविध गुन्ह्यांमध्ये गेल्या वर्षभरापासून फरार असलेल्या आरोपीला पुणे ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वडगाव काशिंबेग परिसरातून शिताफीने अटक केली. आदित्य ऊर्फ गुल्या बबन नवले (वय २४, रा. मोरडेवाडी, मंचर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंचर परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी तसेच फरार व पाहिजे आरोपींवर कारवाई करण्याच्या सूचना पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांनी दिल्या होत्या.





त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मंचर पोलीस ठाण्याच्या हद्दीत लांडवाडी, निघोटवाडी फाटा परिसरात गस्त घालत होते. यावेळी आदित्य नवले हा वडगाव काशिंबेग परिसरात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली.

माहितीच्या आधारे पोलिसांनी परिसरात शोधमोहीम राबवली. त्यावेळी आदित्य नवले हा महादेव मंदिराच्या पाठीमागे लपून बसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तो गेल्या वर्षभरापासून फरार असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपीविरुद्ध मंचर पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हे दाखल आहेत. त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने प्रयत्न सुरू होते.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार, खेड उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईत पोलीस निरीक्षक महादेव शेळार, पोलीस उपनिरीक्षक शरद बांबळे, पोलीस हवालदार संदीप फड, स्वप्नील गाडदे, हनुमंत ढोबळे, योगेश रोडे, भारत मोहळ आणि चेतन पाटील यांनी सहभाग घेतला.

फरार तसेच पाहिजे आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याची मोहीम यापुढेही सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# भीमाशंकर कारखान्याचा अंतिम ऊसदर ३५०० रुपये; दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना मिळणार उर्वरित रक्कम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर : प्रतिनिधी**

पारगाव येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याने मागील गळीत हंगामातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी अंतिम ऊसदर प्रतिटन ३५०० रुपये जाहीर केला आहे. माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीनंतर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी ही घोषणा केली.

कारखान्याने यापूर्वी शेतकऱ्यांना एफआरपीप्रमाणे प्रतिटन ३२७३ रुपये अदा केले आहेत. अंतिम दर ३५०० रुपये निश्चित झाल्याने आता उर्वरित रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. मात्र, त्यातून शिक्षणासाठी १० रुपये आणि भाग विकास निधीसाठी ४० रुपये, अशी एकूण ५० रुपयांची



कपात केली जाणार आहे. कपातीनंतरची उर्वरित रक्कम दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल, अशी माहिती बेंडे यांनी दिली. भीमाशंकर कारखान्यात आतापर्यंत ८ लाख ८३ हजार टन उसाचे गाळप करण्यात आले आहे. खोडवा ऊस उत्पादकांनाही कारखान्याने प्रतिटन १०० रुपये अनुदान दिले आहे. आगामी गळीत हंगामासाठी कारखान्याने १० लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्यामुळे ऊस उपलब्धता, गाळप क्षमता आणि शेतकऱ्यांना वेळेत पेमेंट देण्याच्या दृष्टीने कारखाना प्रशासनाकडून नियोजन करण्यात येत आहे.

या बैठकीस कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे, सचिव रामनाथ हिंगे यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

# लोणी-धामणी परिसरात महावितरणचे अघोषित भारनियमन; बिबट्यांच्या वाढत्या वावरामुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी : प्रतिनिधी**

लोणी : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी आणि वडगावपीर परिसरात गेल्या काही दिवसांपासून महावितरणकडून रात्रीच्या वेळी अचानक वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकरी व ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दिवसा तसेच सायंकाळच्या वेळेतही कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.

पावसाने काही दिवसांपासून ताण दिल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या पिकांना सध्या पाण्याची नितांत गरज आहे. मात्र, रात्रीच्या वेळी अचानक वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतीला पाणी देण्याचे नियोजन कोलमडले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**बिबट्यांचा वावर अन् अंधाराची भीती**

लोणी-धामणी परिसरात बिबट्यांचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये आधीच भीतीचे वातावरण आहे. यापूर्वी बिबट्यांकडून नागरिक तसेच पाळीव जनावरांवर हल्ल्याच्या घटना घडल्या आहेत. अशा परिस्थितीत रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होऊन परिसर अंधारात गेल्यास नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनतो, अशी चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

शेतात पाणी देण्यासाठी रात्रीच्या वेळी बाहेर पडणारे शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. बिबट्यांच्या भीतीमुळे शेतकऱ्यांना रात्री शेतात जाणे धोकादायक वाटत असताना वीजपुरवठा खंडित



झाल्याने त्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

**शेतीचे नियोजन विस्कळीत**

सध्या परिसरात शेतीची विविध कामे सुरू आहेत. पिकांना योग्य वेळी पाणी देण्यासाठी नियमित वीजपुरवठा अत्यंत आवश्यक आहे. मात्र, अचानक वीज गेल्याने पिकांना पाणी देण्याचे नियोजन बिघडत असून शेतकऱ्यांची शेतीची कामे खोळंबत आहेत. वीजपुरवठा खंडित होण्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही होत असल्याचे पालकांनी सांगितले.

अघोषित भारनियमन तातडीने बंद न केल्यास महावितरणच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी आणि ग्रामस्थांनी दिला आहे.

दरम्यान, अघोषित भारनियमनाबाबत महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला असता समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याचा आरोप लोणीचे सरपंच राजेंद्र वाळूंज आणि पारगाव जिल्हा परिषद गटाचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बाळशिराम वाळूंज यांनी केला आहे.

या प्रश्नाबाबत येत्या दोन दिवसांत माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती बाळशिराम वाळूंज यांनी दिली. बिबट्यांचा वाढता वावर, रात्रीचा अंधार आणि त्यात अघोषित वीजखंडितीया तिहेरी संकटामुळे लोणी-धामणी परिसरातील ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा प्रश्न महावितरणने गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

## सारांश वृत्त

### आशियाई क्रीडा स्पर्धेपूर्वी भारत-जपान यांच्यात रंगणार पहिलाच टी-२०टी सामना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

काठमांडू : वृत्तसंस्था

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने शुक्रवारी एक मोठी घोषणा केली आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील अभियानाला सुरुवात करण्यापूर्वी भारतीय पुरुष क्रिकेट संघ जपानविरुद्ध ऐतिहासिक टी-२० सामना खेळणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा पहिला सामना २८ सप्टेंबर रोजी होणार असून, त्याआधी २२ सप्टेंबरला भारत आणि जपान यांच्यात हा सामना रंगणार आहे.

BCCI ने आपल्या अधिकृत एक्स अकाउंटवरून जपानविरुद्धच्या आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यासंदर्भातील माहिती दिली आहे. भारत आणि जपान यांच्यातील राजकिय संबंधांना ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने हा ऐतिहासिक टी-२० सामना आयोजित करण्यात येत आहे. मंगळवार, २२ सप्टेंबर २०२६ रोजी जपानमधील टोचिगी प्रांतातील सानो इंटरनॅशनल क्रिकेट ग्राउंडवर हा सामना खेळवण्यात येणार असून भारतीय वेळेनुसार सामन्याला सकाळी ९.३० वाजता या सामन्याची सुरुवात होईल.

भारत-जपान यांच्यातील हा सामना 'स्पोर्ट ७५' या नव्या उपक्रमाचा भाग आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानचे पंतप्रधान साने ताकाइची यांच्यात झालेल्या बैठकीत या उपक्रमाची संकल्पना निश्चित करण्यात आली होती. या उपक्रमाचा मुख्य उद्देश खेळाच्या माध्यमातून भारत आणि जपानमधील संबंध आणि मैत्री आणखी मजबूत करणे हा आहे.

BCCIचे सचिव देवजीत सैकिया यांनी भारतीय क्रिकेट संघ जपानमध्ये जाऊन हा टी-२० सामना खेळणार असल्याबद्दल आनंद आणि अभिमान व्यक्त केला. त्यांनी सांगितले की, जपान आणि पूर्व आशियातील इतर भागांमध्ये क्रिकेट लोकप्रिय करण्यासाठी हा सामना एक शानदार संधी ठरणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेपूर्वी भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहे. या मालिकेसाठी टीम इंडियाची घोषणा यापूर्वीच करण्यात आली आहे.

# ब्रिक्स न्यायमूर्ती मंचात सरन्यायाधीशांचा मोठा प्रस्ताव; पण व्यावसायिक वाद मिटवण्यासाठी नवा मंच नेमका किती प्रभावी ठरणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली/ वृत्तसंस्था

ब्रिक्स देशांच्या न्यायव्यवस्थांमधील सहकार्य वाढवण्याच्या उद्देशाने आयोजित ब्रिक्स मुख्य न्यायमूर्ती मंचात भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्यासाठी न्यायपालिकेची भूमिका अधोरेखित केली. मात्र, व्यावसायिक वाद सोडवण्यासाठी समान लवाद आणि मध्यस्थी मंच उभारण्याचा प्रस्ताव कितपत प्रत्यक्षात उतरतो, हा प्रश्नही या बैठकीनंतर महत्त्वाचा ठरणार आहे.



४ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या मंचाच्या उद्घाटनाच्या दिवशी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी विविध ब्रिक्स देशांच्या न्यायिक प्रतिनिधीमंडळांच्या प्रमुखांशी स्वतंत्र द्विपक्षीय बैठका घेतल्या. या बैठकींमध्ये न्यायव्यवस्थांमधील सहकार्य, कायदेशीर संवाद आणि परस्पर संबंध अधिक व्यापक करण्यावर भर देण्यात आला.

सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की, बदलत्या जागतिक परिस्थितीत केवळ सरकार-सरकारमधील संबंध पुरेसे नाहीत; न्यायपालिका हीदेखील द्विपक्षीय सहकार्याचा महत्त्वाचा आधारस्तंभ ठरू शकते. विविध देशांच्या न्यायव्यवस्थांमध्ये अनुभवांची देवाणघेवाण आणि संस्थात्मक संवाद वाढल्यास कायदेशीर सहकार्याला अधिक मजबूत दिशा मिळू शकते.

याच पार्श्वभूमीवर त्यांनी व्यावसायिक वादांसाठी लवाद आणि मध्यस्थीची समान व्यवस्था उभारण्याचा प्रस्ताव मांडला. ब्रिक्स देशांमधील व्यापार आणि गुंतवणूक वाढत असताना कंपन्यांमधील करारविषयक किंवा व्यावसायिक वाद जलदगतीने निकाली काढण्यासाठी अशी यंत्रणा उपयुक्त ठरू शकते.

मात्र, समान कायदे, न्यायप्रक्रिया, अधिकारक्षेत्र आणि विविध देशांच्या स्वतंत्र न्यायव्यवस्थांमधील फरक लक्षात घेता हा प्रस्ताव प्रत्यक्षात आणणे सोपे नसेल. मंच, बैठका आणि प्रस्ताव यापलीकडे जाऊन त्याची अंमलबजावणी कशी होणार, यावरच या उपक्रमाचे खरे यश ठरणार आहे.

ब्रिक्सचा विस्तार होत असताना न्यायिक सहकार्याला संस्थात्मक स्वरूप देण्याचा भारताचा प्रयत्न म्हणून या प्रस्तावाकडे पाहिले जात आहे.

## एनएसईला सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दिलासा; 'अन्याय्य प्रवेश' प्रकरणाचा शेवट, पण १५५ दशलक्ष डॉलरचा समझोता नेमका कशासाठी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली (विशेष वृत्त)

भारतीय शेअर बाजारातील सर्वात मोठ्या संस्थांपैकी एक असलेल्या छीलेपरश्र डीैलज्ञ एलहरपसश `ष खपवळरला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. बाजार नियामक सेबीने राष्ट्रीय शेअर बाजाराच्या संगणकीय प्रणालींमध्ये काही घटकांना कथितपणे अन्याय्य प्रवेश मिळाल्याच्या आरोपांवर दाखल केलेले प्रकरण सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी, ४ सप्टेंबर रोजी फेटाळून लावले.

मात्र या निर्णयामागील घडामोडी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या म्हणण्यानुसार, सेबीने हे आरोप तत्त्वतः समझोत्याद्वारे निकाली काढण्यास सहमती दर्शवल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने प्रकरण बंद केले. जुलैमध्येच राष्ट्रीय शेअर बाजाराने या प्रकरणाच्या समझोत्यासाठी तब्बल १५५ दशलक्ष अमेरिकी डॉलर, म्हणजेच भारतीय चलनात अंदाजे १३ हजार कोटींच्या आसपास, देण्याची तयारी दर्शवली होती.

या प्रकरणाच्या केंद्रस्थानी शेअर बाजाराच्या प्रणालींमध्ये काही वापरकर्त्यांना कथितपणे इतरांपेक्षा अधिक वेगाने किंवा अनुकूल पद्धतीने प्रवेश मिळाल्याचे आरोप होते. शेअर बाजारातील संगणकीय व्यवहारांमध्ये काही मिलीसेकंदांचाही फरक महत्त्वाचा ठरू शकतो. त्यामुळे अशा प्रणालींमध्ये कोणाला विशेष किंवा अनुचित फायदा मिळाला का, हा प्रश्न बाजारातील पारदर्शकतेशी थेट जोडलेला आहे.

सर्वोच्च न्यायालयाने प्रकरण फेटाळले असले, तरी इतक्या मोठ्या रकमेचा समझोता का करावा लागला आणि आरोपांमागील नियामक चिंतेचे काय झाले, यावर चर्चा होणे स्वाभाविक आहे.

## संयुक्त राष्ट्र महासभेत २६ सप्टेंबरला जयशंकर यांचे भाषण; भारताचा जागतिक मंचावर नेमका अजेंडा काय असणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

संयुक्त राष्ट्र : प्रतिनिधी

भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हे २६ सप्टेंबर रोजी संयुक्त राष्ट्र महासभेच्या वार्षिक उच्चस्तरीय अधिवेशनातील सर्वसाधारण चर्चेला संबोधित करणार आहेत. सुधारित तात्पुरत्या वक्त्यांच्या यादीत जयशंकर यांचे नाव समाविष्ट करण्यात आले असून, दुपारच्या सत्रात त्यांचे भाषण होणार आहे.

संयुक्त राष्ट्र महासभेचे ८१वे अधिवेशन ८ सप्टेंबरपासून सुरू होणार असून, १९३ सदस्य देशांच्या प्रमुख नेत्यांकडून आणि प्रतिनिधींकडून जागतिक प्रश्नांवर भूमिका मांडली जाणार आहे. महासभेतील सर्वसाधारण चर्चा २२ ते २८ सप्टेंबरदरम्यान होणार आहे. त्यामुळे भारताला आपली परराष्ट्रनीती आणि जागतिक मुद्द्यांवरील भूमिका थेट आंतरराष्ट्रीय समुदायासमोर मांडण्यासाठी महत्त्वाचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

जयशंकर यांच्या भाषणाकडे विशेष लक्ष लागण्याचे कारण म्हणजे सध्याचे बदलते जागतिक समीकरण. विविध भागांमध्ये सुरू असलेले संघर्ष, जागतिक व्यापारातील तणाव, दहशतवाद, ऊर्जा सुरक्षा, हवामान बदल, अन्नसुरक्षा आणि विकसनशील देशांसमोरील आर्थिक आव्हाने हे मुद्दे महासभेच्या चर्चेच्या केंद्रस्थानी राहण्याची शक्यता आहे.

भारताकडून संयुक्त राष्ट्रांच्या सुधारणांचा मुद्दाही पुन्हा अधोरेखित केला जाण्याची शक्यता आहे. विशेषतः सुरक्षा परिषदेत भारताला कायमस्वरूपी सदस्यत्व मिळावे, या दीर्घकाळापासूनच्या मागणीला आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न भारत करत आहे.

मात्र, आंतरराष्ट्रीय मंचावर भारताची प्रतिमा केवळ मोठी अर्थव्यवस्था किंवा प्रभावशाली शक्ती म्हणून मांडण्यापेक्षा जागतिक समस्यांवर भारताची ठोस भूमिका आणि प्रत्यक्ष योगदान काय आहे, यावरही जयशंकर यांना भाष्य करावे लागणार आहे. २६ सप्टेंबरचे भाषण त्यामुळे केवळ औपचारिक राजनैतिक भाषण न राहता, बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारत स्वतःची भूमिका कुठे आणि कशी निश्चित करतो, याचा महत्त्वाचा संकेत ठरणार आहे.

# चिराग पासवानांच्या नावाचा 'राजकीय कवच' म्हणून वापर?

## हिंदुत्ववादी प्रभावकाविरोधात पोलिसांत तक्रार; एलजेपीचा थेट एफआयआरचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री आणि चिराग पासवान यांच्या नावाचा कथित गैरवापर केल्याचा आरोप करत लोक जनशक्ती पक्षाने (रामविलास) हिंदुत्ववादी प्रभावक स्वतंत्र भारडज यांच्याविरोधात पोलिसांत धाव घेतली आहे. संसद मार्ग पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत भारडज यांनी चिराग पासवान यांचे नाव खोट्या आणि सार्वजनिक पद्धतीने वापरून राजकीय संरक्षण असल्याचा दावा केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जुलै महिन्यात जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान एका विद्यार्थी कार्यकर्त्याच्या वडिलांवर कथित हल्ला झाला होता. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भारडज यांनी आपल्याला राजकीय पाठबळ असल्याचे संकेत दिल्याचा दावा पक्षाने केला आहे. त्यामुळे या प्रकरणाला आता राजकीय रंग चढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

लोक जनशक्ती पक्षाने स्पष्ट केले आहे की स्वतंत्र भारडज यांचा चिराग पासवान किंवा पक्षाशी कोणताही अधिकृत संबंध नाही. तरीही त्यांच्या नावाचा वापर करून राजकीय संरक्षण असल्याचा आभास निर्माण केला जात असेल, तर तो गंभीर प्रकार असल्याचे पक्षाचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, एखाद्या केंद्रीय मंत्र्याचे नाव सार्वजनिकरित्या वापरून स्वतःभोवती राजकीय प्रभाव किंवा संरक्षणाचे वलय निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप समोर आल्याने पोलिस तपासाची मागणी अधिक गंभीर बनली आहे.

पक्षाने पोलिसांकडे भारडज यांच्याविरोधात प्रथम माहिती अहवाल दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मात्र, तक्रारीतील आरोप सिद्ध झालेले नाहीत आणि पोलिस तपासानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

या प्रकरणामुळे एक मूलभूत प्रश्नही समोर आला आहेराजकीय नेत्यांची नावे वापरून प्रभाव निर्माण करण्याला किती काळ मोकळे रान मिळणार? चिराग पासवान यांनी स्वतः पुढे येऊन नावाच्या कथित गैरवापराविरोधात तक्रार दाखल केल्याने आता पोलिस या आरोपांकडे किती गांभीर्याने पाहतात, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

# ओबीसी क्रीमी लेयरवर बिहार सरकारचा स्पष्ट आदेश; आई-वडिलांचा पगार, शेतीचे उत्पन्न मोजणार नाही, नियमांची अंमलबजावणी की संभ्रम कायम?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

ओबीसी आरक्षणातील क्रीमी लेयर ठरवताना आई-वडिलांचा पगार आणि शेतीतून मिळणारे उत्पन्न ग्राह्य धरू नये, असे बिहार सरकारने पुन्हा स्पष्ट केले आहे. सामान्य प्रशासन विभागाने १ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या आदेशातून राज्यातील अधिकाऱ्यांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित निर्णयांचा स्पष्ट संदर्भ आदेशात नसल्याने या भूमिकेच्या कायदेशीर व्याप्तीबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

बिहार सरकारच्या म्हणण्यानुसार, केंद्र आणि राज्य सरकारकडून यापूर्वी जारी करण्यात आलेल्या क्रीमी लेयरच्या उत्पन्न निकषांमध्ये पालकांचा पगार आणि कृषी उत्पन्न वेगळ्या पद्धतीने हाताळण्याच्या स्पष्ट तरतुदी आहेत. त्यामुळे ओबीसी उमेदवाराच्या क्रीमी लेयरची पात्रता तपासताना अधिकाऱ्यांनी या दोन उत्पन्न स्रोतांचा सरसकट समावेश करू नये.

ओबीसी आरक्षणाचा लाभ कोणाला मिळावा आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांना आरक्षणाच्या बाहेर कसे ठेवावे, यासाठी क्रीमी लेयरची संकल्पना महत्त्वाची आहे. मात्र, उत्पन्नाची गणना करताना नेमके कोणते उत्पन्न धरायचे आणि कोणते वगळायचे, यावर अनेकदा प्रशासकीय आणि न्यायालयीन वाद निर्माण झाले आहेत.




विशेष म्हणजे, १ सप्टेंबरच्या बिहार सरकारच्या आदेशात 'रोहित नाथन' प्रकरणाचा किंवा त्यामध्ये उत्पन्न निकषाच्या अंमलबजावणीसंदर्भात उपस्थित झालेल्या मुद्द्यांचा स्पष्ट उल्लेख नाही. त्यामुळे सरकारचा आदेश विद्यमान नियमांची पुनरावृत्ती आहे की न्यायालयीन चर्चेच्या पार्श्वभूमीवर घेतलेली नवी भूमिका, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

सरकारने अधिकाऱ्यांना नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले असले, तरी प्रत्यक्ष प्रमाणपत्र देताना उत्पन्नाचे वर्गीकरण कसे केले जाते, हा खरा प्रश्न आहे.

आरक्षणाच्या हक्काशी संबंधित निर्णयांमध्ये एका चुकीच्या उत्पन्न गणनेमुळे पात्र उमेदवार वंचित राहू शकतो. त्यामुळे बिहारचा हा आदेश कागदावर स्पष्ट असला, तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती पारदर्शक आणि एकसमान होते, यावरच त्याचे महत्त्व ठरणार आहे.

# 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली कोट्यवधींची लूट! सीबीआयचा २० राज्यांत धडाका; ८९ ठिकाणी छापे, तीन आरोपी अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

पोलिसांच्या गणवेशाचा धाक, व्हिडिओ कॉलवर बनावट चौकशी, खोटे गुन्हे आणि 'तुम्हाला डिजिटल अरेस्ट करण्यात आले आहे' अशी धमकी देत नागरिकांकडून कोट्यवधी रुपये उकळणाऱ्या सायबर टोळ्यांविरोधात केंद्रीय अन्वेषण विभागाने मोठी कारवाई सुरू केली आहे. 'ऑपरेशन चक्र-६' अंतर्गत सीबीआयने तब्बल २० राज्यांतील ८९ ठिकाणी एकाच वेळी झडती घेत डिजिटल अरेस्टच्या नावाखाली चालणाऱ्या फसवणुकीचे आर्थिक जाळे उघड करण्यास सुरुवात केली आहे.

या कारवाईत आतापर्यंत तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र, सीबीआयच्या कारवाईमुळे समोर आलेला सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे फसवणूक करणारे केवळ पैसे उकळून थांबत नाहीत, तर काही तासांतच वेगवेगळ्या बँक खात्यांमधून तो पैसा फिरवून त्याचा मूळ माग काढणे कठीण करण्याचा प्रयत्न करतात.

सीबीआयच्या तपासानुसार, आरोपींकडून नागरिकांना पोलिस किंवा अन्य तपास यंत्रणांचे अधिकारी असल्याचे भासवले जात होते. व्हिडिओ कॉलवर पीडितांना धमकावून त्यांच्या नावावर गुन्हा दाखल असल्याचे सांगितले जात होते. त्यानंतर चौकशी किंवा अटकेपासून वाचण्यासाठी मोठी रक्कम विशिष्ट बँक खात्यांमध्ये जमा करण्यास भाग पाडले जात होते. भीती निर्माण करा, विश्वास बसवा आणि काही मिनिटांत बँक खाते रिकामे कराहीच या डिजिटल फसवणुकीची धोकादायक कार्यपद्धती बनली आहे.

या तपासात हरियाणातील आकाश नावाच्या आरोपीची भूमिका विशेषतः समोर आली आहे. सीबीआयच्या माहितीनुसार, त्याने स्वतः उघडलेल्या बँक खात्यात फसवणुकीतून मिळालेले तब्बल १.९५ कोटी जमा झाले. धक्कादायक बाब म्हणजे ही रक्कम त्याने त्याच दिवशी पुढे वळवल्याचा आरोप आहे. म्हणजेच, बँक खाते उघडणे, फसवणुकीची रक्कम स्वीकारणे आणि ती तातडीने दुसरीकडे पाठवणेया संपूर्ण प्रक्रियेत 'मनी म्युल' म्हणून खात्यांचा वापर कसा केला जातो, याचा तपास यंत्रणा शोध घेत आहे.

कोलकात्यातील राजा कर्माकर याच्यावरही गंभीर आरोप आहेत. त्याच्या कंपनीच्या खात्यातून सुमारे १.५ कोटींची फसवणुकीची रक्कम वळवण्यात आल्याचा आरोप आहे. तर ज्योती राणी हिने तिच्या खात्यात जमा झालेल्या रकमेपैकी काही हिस्सा रोख स्वरूपात काढला आणि उर्वरित पैसा पुढे हस्तांतरित केल्याचा आरोप तपासात समोर आला आहे.

सीबीआयने या कारवाईसाठी केवळ संशयितांच्या ठिकाणांवर छापे टाकले नाहीत, तर बँक व्यवहार, डिजिटल खात्यांवरील प्रवेश आणि पैशांच्या हालचालींचे विश्लेषण करून तपासाचे धागेदोरे जोडले आहेत. फसवणुकीतून मिळालेला पैसा नेमका कुठे गेला, कोणत्या खात्यांमधून फिरला आणि अखेरीस त्याचा फायदा कोणाला झाला, याचा माग काढण्यावर तपासाचा भर आहे.

डिजिटल अरेस्ट ही प्रत्यक्षात कायदेशीर अटक नसून सायबर गुन्हेगारांनी निर्माण केलेली भीती आणि फसवणुकीची युक्ती आहे. तरीही अनेक सुशिक्षित नागरिकही पोलिस, न्यायालय किंवा तपास यंत्रणेच्या नावाने घाबरून लाखो-कोट्यवधी रुपये देतात.

आता प्रश्न एवढाचनागरिकांच्या भीतीवर कोट्यवधींचा धंदा करणाऱ्या या डिजिटल गुन्हेगारी साम्राज्याच्या मुळापर्यंत सीबीआय पोहोचणार का? ८९ ठिकाणांवरील कारवाईनंतर अटक झालेल्या आरोपींपेक्षा मोठे नेटवर्क समोर येते का, हे पुढील तपासात स्पष्ट होणार आहे.

मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे'डिजिटल अरेस्ट'च्या नावाने फोनवर धमकी देणाऱ्यांना घाबरून पैसे देण्याऐवजी त्यांची तात्काळ माहिती पोलिसांना देणे, हाच नागरिकांसाठी सर्वात सुरक्षित मार्ग आहे.